## नि.क्र. २५ वर आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ०९ ने तिच्या विरूध्द दिनांक १६/०८/२०२२ रोजी झालेला उत्तरपत्र नाहीचा आदेश रद्द होण्याकरीता दिला आहे. तिचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ते ०९ या सख्या बहीणी आहेत. प्रतिवादी क्र. ०१ खमरूनिसा हिने तिला आशवस्त केले होते की, तू काही भांडू नको, तुझी मिळकत मी जाऊ देणार नाही. परंतु प्रतिवादी क्र. ०१ खमरूनिसा ही दावा चालु असताना मयत झाली. त्यानंतर ती आजारी पडली त्यामुळे ती दिनांक १६/०८/२०२२ रोजी न्यायालयात हजर राहू शकली नाही आणि आपले उत्तरपत्र दाखल करू शकली नाही. जर प्रतिवादीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी मिळाली नाही तर ते नैसर्गिक न्यायाला धरून होणार नाही. तसेच त्यामुळे तिचे भरून न येणार नुकसान होईल. करीता अर्ज मंजूर करण्यात यावी अशी विनंती केली.

२. वादीने अर्जास हरकत घेतली की, सदरचा अर्ज हा ब-याच दिवसानंतर जाणुनबुजुन प्रकरण प्रलंबित करण्याकरीता दिला आहे. म्हणून प्रतिवादी क्र. ०९ चे उत्तरपत्र दाखल करून घेण्यासाठी जास्तीत जास्त शुल्क आकारावी अशी विनंती केली.

३. अर्ज आणि त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीस नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे तिची बाजु मांडण्याचा अधिकार आहे ही बाब मी विचारात घेत आहे. मात्र त्याच बरोबर उत्तरपत्र झालेल्या विलंबामुळे वादीला भरपाई करून देणे न्यायोचीत राहील. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

### आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रूपये ५००/- च्या शुल्कासह मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी क्र.०९ विरूध्द दिनांक १६/०८/२०२२ रोजीचा उत्तरपत्र नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो. |

VEDVATI CHANDRASHEKHAR DESHPANDE
Digitally signed by VEDVATI CHANDRASHEKHAR DESHPANDE
Date: 2023.08.02 16:22:16 +0530

दिनांक ०२/०८/२०२३ (वेदवती चं. देशपांडे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, जिंतूर.